

हॅप्पी पेरेंटिग...

डॉ. सुनील गोडबोले



# हॅप्पी पेरेंटिग : खोटे बोलण्यामागचे ‘खरे’ पैलू

डॉ. सुनील गोडबोले, बालविकास तज्ज्ञ.

सकाळ: कुटुंब (8 April 2023)

जन्मत: गोड निरागस बाळ जेव्हा मोठे झाल्यावर अचानक खोटे बोलायला लागते, तेथे आई-वडिलांना मोठा धक्का बसतो. मग त्यावर आरडाओरडा, कबुलीजबाब, सारखं लक्ष ठेवणे असले ‘उपचार’ सुरू होतात... पण ‘खरंच’ मुले ‘खोटे’ का बोलतात?

खोट्यालाही वय असते! म्हणजे साधारणतः दोन-तीन वर्षांची मुले मनातले विचार, मग ते निरर्थक आणि खरे नसले तरीही सहज बोलतात. त्यात अफाट कल्पनाशक्ती, शब्दखेळ आणि एक निष्पाप, खट्याळपणा असतो. अशा वेळेस फक्त ‘कल्पना’ आणि ‘वास्तव’ यातला फरक सांगणे एवढेच पुरेसे असते.

तीन ते पाच वर्षांतली मुले मिळालेली माहिती आणि स्वत:ची कौशल्ये यांची सांगड घालताना ‘बाता’ मारतात. उदाहरणार्थ, सुपरमॅनचा चित्रपट बघून एखादे चिमुरडे ‘मी आज शाळेतून उडत आलो!’ असं सहज सांगते. यावेळेसही फक्त ‘हसून दुर्लक्ष’ किंवा ‘वास्तवाचे भान’ समजून देणे पुरेसे असते.

पाच ते आठ वर्षांची मुले एकतर आईवडिलांना खूश करण्यासाठी किंवा शिक्षा चुकवण्यासाठी खोटे बोलतात. आता मात्र त्यांना ‘गुन्हेगार’ ठरवून शिक्षा करणे टाळावे- कारण त्यातून मुले अजून लपवाछपवी करतील. त्यापेक्षा मुलांना खरे बोलता येईल, अशी परिस्थिती निर्माण करूया! खरे सांगण्याने शिक्षा कमी होते आणि पालकांचा आश्वासक आधार मिळतो हे कळले पाहिजे.

याच वयात काही मुले खोटे बोलण्याच्या अस्त्राचा ‘लक्षवेधी’ वापर करतात. ‘आपण खोटे बोलले, की आई-वडील लक्ष देतात (खरंतर ओरडतात), हा वेगळाच आनंद असतो. याचं उत्तर मुलांना एकूणच ‘वेळ’ जास्त देण्यात आहे आणि हे करताना सगळ्या कुटुंबाने एकसारखी भूमिका घ्यावी.

काही वेळा आपण मोठेच मुलांसमोर खोटे बोलतो. अनुकरणप्रिय आणि स्वतःच्या सोईचे तेच उचलणारी मुले मग नको त्या सवयी बरोबर उचलतात. म्हणून अशावेळेस स्वतःच्याच वागण्याबोलण्याकडे विचारपूर्वक बघावे.

मोठी मुले मात्र आता समजून उमजून खोटे बोलू शकतात. कधी मित्रांबरोबरच्या चढाओढीतून, कधी स्वतःची क्षमता कमी पडत असेल तर, कधी वाईट संगतीतून, तर कधी स्वार्थासाठी मुले खोटे बोलतात. हे वाईटच! त्यासाठी मुलांच्या मित्रपरिवाराशी मैत्री करावी आणि समजुतीने, वेळ देऊन उत्तर शोधावे.

मुलांच्या थापांचा भुलभुलैय्या बाजूला सारून क्षणभर त्यांच्या मनात ‘दडलंय काय’ हे समजून घेतले, तर मुलांचे खोटे बोलणे खरोखर कमी होईल.

(लेखक ज्येष्ठ बालविकासतज्ज्ञ आहेत.)

www.chiranjeevgodbole.com